सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. समुप-२०१३/ प्र.क्र.५ (भाग-३) (ई-८५४३५७)/का-१०, दि. २४/०६/२०२६.

**विषय** :- राज्यातील पोलीस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. समुप-२०१३/ प्र.क्र.५ (भाग-३) (ई-८५४३५७)/ का-१०, दि.२४/०६/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०६२४११३४४०५८३० असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 25-06-2026 16:28:13

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह).
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह).

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राज्यातील पोलीस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-३) (ई-८५४३५७)/का-१०**
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक - २४ जून, २०२६.

**संदर्भः-**

१) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००१/प्र.क्र.६८/का-२, दि.१६.०८.२००१,
२) महिला व बाल विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२००१/प्र.क्र.६८/का-२, दि.१६.०८.२००३,
३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१२/प्र.क्र.१९/का-१०, दि.२७.०६.२०१२,
४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५/का-१०, दि.०४.०१.२०१४,
५) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-२)/का-१०, दि.१७.१०.२०१४,
६) महिला व बाल विकास विभाग, शासन पत्र क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-३)/का-१०, दि.०६.०३.२०२५,
७) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-३)/का-१०, दि.१६.०५.२०२५.

**प्रस्तावना-**

महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी राज्यातील पोलीस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी गठित राज्यस्तरीय सुकाणू समितीचे अध्यक्ष तथा अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२०.०२.२०२५ रोजी आयोजित बैठकीमध्ये समुपदेशन केंद्रे स्थापन करण्याच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखालील छाननी समितीने शिफारस केलेल्या संस्थांना समुपदेशन केंद्र स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत निर्णय घेण्यात आला.

२. तथापि, नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार (जिल्हास्तर), शहादा व नवापूर येथील तालुका/ पोलीस स्टेशनमध्ये समुपदेशन केंद्र स्थापन करण्यासाठी दिग्नाग फाऊंडेशन, देवपूर, धुळे या संस्थेकडून प्रस्ताव दाखल करण्यात आलेले होते. परंतु छाननी समिती, नंदुरबार यांनी सदरचा प्रस्ताव Not Applicable असा शेरा देऊन नाकारला. त्याविरुध्द दिग्नाग फाऊंडेशन, देवपूर, धुळे या संस्थेने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ

औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.१७७१/२०२५ दाखल केली. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२७.०२.२०२५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत :-

We dispose of the writ petition, permitting the petitioner to approach respondent No.5 who shall extend an opportunity to the petitioner to place on record the order passed in the change report enquiry and to produce additional documents, and directing him to take a fresh decision on the petitioner's on its own merits.

३. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.१७७१/२०२५ मध्ये मा.न्यायालयाने दि.२७.०२.२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखालील छाननी समितीने दि.१९.०५.२०२५ च्या बैठकीत दिग्नाग फाऊंडेशन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल जवळ, चंदनगर, देवपूर, धुळे या संस्थेस एकूण ७२ गुण दिले आहेत.

४. दिग्नाग फाऊंडेशन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल जवळ, चंदनगर, देवपूर, धुळे या संस्थेस नंदुरबार जिल्ह्यातील शहादा, नंदुरबार (जिल्हास्तर) व नवापूर येथील तालुका/ पोलीस स्टेशन या ठिकाणच्या ०३ समुपदशोन केंद्रांकरिता अनुक्रमे ०२, ०३ व ०२ असे गुणानुक्रम दिले आहेत. त्यामुळे राज्यस्तरीय सुकाणू समितीचे अध्यक्ष तथा अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२०.०२.२०२५ रोजी आयोजित बैठकीमध्ये छाननी समितीने मान्यता दिलेल्या संस्थांमध्ये बदल होत नाही. त्यामुळे राज्यस्तरीय प्रकल्प सुकाणू समितीचे अध्यक्ष तथा अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारास आळा घालण्यासाठी पोलीस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी गठित राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या दि.२०.०२.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>-**

महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी राज्यातील पोलीस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांपैकी **<u>परिशिष्ट-अ</u>** मध्ये नमूद ०३ स्वयंसेवी संस्थांना त्यापुढे नमूद केलेल्या जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी/ पोलीस स्टेशनच्या आवारात समुपदेशन केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रासाठी संदर्भाधीन क्र.५ येथील दि.१७.१०.२०१४ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे लागू राहतील.

३. सदर केंद्रांना आवश्यक जागा, फर्निचर, टेलिफोन, स्टेशनरी व इतर मुलभूत सुविधा संबंधित पोलीस स्टेशनने उपलब्ध करुन द्याव्यात. सदर समुपदेशन केंद्राकरीता लागणाऱ्या खर्चाचा तपशील संदर्भाधीन क्र.१, २ व ४ येथील अनुक्रमे दि.१६.०८.२००१, दि.१६.०८.२००३ व दि.०४.०१.२०१४ मधील शासन निर्णयात विहित केल्यानुसार राहील.

४. सदर समुपदेशन केंद्र तात्काळ कार्यान्वित करण्याबाबतची कार्यवाही संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी करावी व सदर समुपदेशन केंद्र कार्यान्वित झाल्याबाबत पोलीस अधीक्षक यांनी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना अहवाल सादर करावा.

५. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी सदर समुपदेशन केंद्र कार्यान्वित झाल्याबाबत व त्यांच्या कामकाजाबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा.

६. पोलीस स्टेशनच्या आवारात कार्यरत महिला समुपदेशन केंद्रातील समुपदेशक सामाजिक कार्य शाखेतील पदव्युत्तर पदवी अर्हताप्राप्त (MSW) असावेत.

७. संबंधित संस्थेने सदर समुपदेशन केंद्रावर दर्शनी भागात खालीलप्रमाणे फलक लावावा. (सदर फलकावर संस्थेचे नाव नसावे.)

"महिला समुपदेशन केंद्र,
(महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांची मान्यता प्राप्त)"

८. यावरील होणारा खर्च मागणी क्रमांक एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १०३, महिला कल्याण, (२१) (०१) महिला समुपदेशन केंद्रे (२२३५ ३१७७), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

९. सदर शासन निर्णय राज्यस्तरीय प्रकल्प सुकाणू समितीचे अध्यक्ष तथा अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारास आळा घालण्यासाठी पोलीस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी गठित राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या दि.२०.०२.२०२५ रोजी आयोजित बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६२४११३४४०५८३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAHEBRAO
DHANRAJ BHOYE

Digitally signed by SAHEBRAO DHANRAJ BHOYE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=201303bc41ec1fa4d14ccef33019b230317b039f951887dd25d72febda91bf82, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9F3A08DCEC2321C344A1916033CF8C938EFBE80C42926638012D340624F73C19, cn=SAHEBRAO DHANRAJ BHOYE
Date: 2026.06.24 11:35:47 +05'30'

**( साहेबराव भोये )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु., क्री.व यु.क, अ.वि.व औ.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (गृह), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. प्रधान सचिव, (व्यय) / (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,

१३. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१५. पोलीस उप महासंचालक (महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१६. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई,
१७. पोलीस महासंचालक, पोलीस मुख्यालय, मुंबई,
१८. विशेष पोलीस महानिरिक्षक (महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष), पुणे,
१९. सचिव, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई,
२०. संचालक, महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा,
२१. प्रबंधक, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई,
२२. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
२३. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, बांद्रा, मुंबई,
२४. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई,
२५. महाप्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२६. सर्व निबंधक, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर / औरंगाबाद,
२७. सर्व जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय,
२८. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
२९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
३०. राज्य समन्वयक (PPMU), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
३१. सर्व पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक,
३२. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), मुंबई,
३३. महालेखापाल, महाराष्ट्र २ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), नागपूर,
३४. उप आयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
३७. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
३८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३९. सर्व मंत्रालयीन विभाग,
४०. सर्व अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
४१. समन्वयक, महिला व बालकांचे विशेष कक्ष, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, देवनार, मुंबई,
४२. परिशिष्ट-अ मधील सर्व स्वयंसेवी संस्था (आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांच्यामार्फत),
४३. सर्व महिला समुपदेशन केंद्र / सेवा पुरविणारे / सर्व आश्रयगृहे (आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्यामार्फत),
४४. निवड नस्ती/का-१०.

**शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-३) (ई-८५४३५७)/का-१०, दि.२४ जून, २०२६ चे**

**“परिशिष्ट-अ”**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका/ पोलीस स्टेशनचे नाव | समुपदेशन केंद्रास मान्यता देण्यात आलेल्या संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | शहादा | युवकमित्र परिवार संस्था, कोठली, ता.शहादा, जि.नंदुरबार |
| २ | | नंदुरबार (जिल्हास्तर) | श्री.अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ, तळोदा रोड, सिंधी कॉलनी रोड, नंदुरबार |
| ३ | | नवापूर | पुष्पवन महिला बहुद्देशिय संस्था, नवापूर, जि.नंदुरबार |

SAHEBRAO DHANRAJ BHOYE

Digitally signed by SAHEBRAO DHANRAJ BHOYE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=201303bc41ec1fa4d14ccef33019b230317b039f951887dd25d72febda91bf82, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=9F3A08DCEC2321C344A1916033CF8C938EFBE80C42926638012D340624F73C19, cn=SAHEBRAO DHANRAJ BHOYE
Date: 2026.06.24 11:36:14 +05'30'

( साहेबराव भोये )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन